ज ळ ग - ३
दस्त.क्र. ५८८/२०१९
१८/५८

२२) सदरचे विकसन कराराने उपरोक्त प्लॉट मिळकतीचे मोबदल्यात लिहून देणाऱ्यांना मोबदला म्हणून मिळणार असलेल्या रकमेबाबत जे काही प्राप्तीकर वगैरे येईल तो आम्ही लिहून देणार यांनी स्वतः भरावयाचा आहे त्याबाबतची काही एक जबाबदारी तुम्ही लिहून घेणार यांचेवर राहणार नाही.

२३) सदरचा डेव्हलपमेंट/विकसन करारनामा सदर प्लॉट मिळकती वरील नियोजित इमारतीतील रहिवासी फ्लॅटस् वगैरे खरेदीदारांचे नांवाने पुर्णपणे तबदील होईपावेतो अस्तित्वात राहावयाचा आहे व राहील.

२४) सदर उपरोक्त प्लॉट मिळकतीवरील नियोजित इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेवर तुम्ही लिहून घेणार यांनी सहकारी सोसायटी किंवा अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन स्थापन करावयाची आहे व त्या सहकारी सोसायटी किंवा अपार्टमेंट ओनर्स असोसिएशनचे सर्व नियम, अटी व शर्ती आम्ही लिहून देणार यांचेवर बंधनकारक राहतील त्याबाबत आम्ही काही एक हिला हरकत घेणार नाही किंवा सांगणार नाही.

२५) सदरील दस्तामधील लिहून घेणार व लिहून देणार यांचे मधील काही व्यक्तींचे निधन झाल्यास सदरील दस्त बेकायदेशीर ठरणार नाहीत. तसेच मृत व्यक्तीच्या वारसांवर सदरील दस्त त्यामधील सर्व मजकुरासह बंधनकारक राहील व अशा परिस्थितीमध्ये मृत व्यक्तीचे वारस या

Scanned with CamScanner

ज ल न - ३
दस्त.क्र.७८६/२०१९
१७५८

दस्ताचेच पक्षकार आहेत असे गृहीत धरण्यात येईल व यदाकदाचित लिहून घेणार यांनी याबाबत कोणताही दस्त लिहून मागीतला तर तो लिहून देणे वारसांवर बंधनकारक राहील.

२६) उपरोक्त प्लॉट जागेवरील डेव्हलपमेंट संबंधातील वर नमुद केलेली कामे करणे तुम्ही लिहून घेणार यांना सोईस्कर जावे व तुम्हांस काही एक अडी अडचण येऊ नये म्हणून तुमचे लाभात एक स्वतंत्र कधीही रद्द न होणारे मुखत्यार पत्र- इररिव्होकेबल पॉवर ऑफ ॲटर्नी आम्ही लिहून देणार यांनी तुम्ही लिहून घेणार यांना आज रोजी सदरचे दस्तासोबत लिहून व नोंदवुन दिलेले आहे.

२७) सदर वर सविस्तर वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतीवरील नियोजित इमारतीबाबत काही एक वाद उत्पन्न झाल्यास त्याकामी दिवाणी, फौजदारी, रेव्हेन्यु, धर्मदाय, सहकारी व इतर अन्य न्यायालयात काही एक दावे फाटे दाखल झाल्यास त्याकामी दिवाणी, फौजदारी मुलकी रेव्हेन्यु अगर अन्य कुठल्याही कोर्टात दावा दाखल करणे, त्यावर सह्या करणे, कोर्टात समक्ष हजर राहणे, जाब-जबाब देणे, तोंडी पुरावा देणे, तसेच सदर प्लॉट मिळकती संबंधाने आमचेवर दावा, दावे झाल्यास सदर कामी दावा, फाटा, अर्ज वगैरे बाबत समन्स नोटीसा रिटर्न स्वीकारणे कोर्टाचे समक्ष हजर राहणे, कैफियत देणे, प्रतिज्ञापत्र देणे, सह्या करणे, पुरावा

JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 JALGAON-3
Scanned with CamScanner

जलन - ३
दस्त.क्र. २०८८/२०१९
२०५८

देणे, कागदपत्र हजर करणे, बचाव करणे, तसेच कनिष्ठ कोर्टाचे हुकूमाविरुध्द बरीष्ठ कोर्टात अपील करणे, अपिल मेमोवर सह्या करणे व सदर कोर्ट कारवाईकामी अव्वल कोर्टापावेतो पूर्व पक्ष अगर उत्तर पक्ष म्हणून हजर राहुन कारवाईचा अंतिम निकाल घेणे, उपरोक्त कोर्ट कारवाई कामी वकील, बॅरिस्टर, ॲडव्होकेट नेमणे, त्यांचे वकिलपत्रावर सह्या करणे, त्यांची फी देणे, उपरोक्त कोर्ट कारवाई कामी मिळालेल्या हुकूम/ हुकूमनाम्यानुसार दरखास्त दाखल करणे, सह्या करणे कब्जा घेणे, कब्जापावती लिहून देणे-घेणे वगैरे सर्व कामे करण्याचे हक्क व अधिकार आम्ही लिहून देणार यांनी तुम्ही लिहून घेणार यांना सदरचे विकसन कराराने दिलेले आहे.

२८) सदरचा विकसन करारनामा करुन दिल्यावर सदर प्लॉट मिळकतीचे निर्वेध, निजोखमी व बोझे विरहित पणाचे टॉयटल क्लिअर असल्याचे प्रमाणपत्र तुम्ही तुमचे स्वखर्चाने काढावयाचे आहे मात्र सदर प्लॉट मिळकतीचे टायटलमध्ये काही एक अडचणी उद्‌भवल्यास त्याचे निवारण आम्ही लिहून देणार (प्लॉट मालक) यांनी तुम्हांस करून द्यावयाचे आहे व त्याबाबतचे येणारे खर्चाची जबाबदारी सुध्दा आम्ही लिहून देणार यांचेवर आहे व राहील.

२९) सदर प्लॉट मिळकतीवर नियोजित इमारतीचे बांधकाम करतांना कोणताही अपघात झाल्यास, जिवहानी, वित्तहानी

Scanned with CamScanner

जळन – ३
दस्त.क्र २८८८/२०१९
२९/४५

झाल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी विकासक म्हणून तुम्ही लिहून घेणार यांचेवर आहे व राहील त्याबाबतची काही एक आर्थिक तोषीस प्लॉट मालक म्हणून आम्ही लिहून देणार यांचेवर राहणार नाही व त्याने खरेदीदार यांना वेळेवर ताबे न दिल्यास त्याची जबाबदारी लिहून घेणार यांचेवर राहील त्यांस लिहून देणार जबाबदार राहणार नाही.

येणेप्रमाणे सदरचा डेव्हलपमेंट करारनामा आम्ही लिहून देणार यांनी राजीखुशीने, स्वसंतोषाने, समजून, उमजून, वाचून घेऊन, उभयसाक्षीदारांसमक्ष सह्या करून, **पान क्रमांक १ वर नमुद केलेल्या तारखेस** जळगांव मुक्कामी लिहून दिला असे. (टाईपसेट द्वारा : रमेश एम. मुळे, जळगांव)

राहुल सिव्हील ॲन्ड मेकॅनिकल कन्स्ट्रक्शन्स्
प्रा.लि. तर्फे डायरेक्टर्स





१. श्री.विजय शरद बधान





२. श्री. मिलिंद प्रल्हाद अमृतकर

– लिहून देणार –

| |
|---|
| ज ल न - ३ |
| दस्त.क्र. ८८६/२०१९ |
| ५४/५८ |

जैन बिल्डकॉन चे भागीदार



१. श्री. सिध्दार्थ अरविंदकुमार जैन



२. श्री. आकाश अरविंदकुमार जैन



३. श्री. मनोजकुमार इंदरचंद सुराणा

- लिहून घेणार -

साक्षीदार

१. ______________ २. ______________

नांव : नितीन टेलखेवार नांव : ध्रुव टेक. ठाकुर

पत्ता : खान्देश मिल कॉलनी जळगांव. पत्ता : गणपती नगर जळगांव.